**ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभागांच्या सीमा निश्चित करण्यासाठी नव्याने कार्यक्रम**

१.माहे जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२१ मध्ये मुदत संपलेल्या सुमारे १८८९ ग्रामपंचायती

२. माहे जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे ६७०७ ग्रामपंचायती तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायती

३. आयोगाने प्रभाग रचना व आरक्षणाबाबत दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेला कार्यक्रम चुकीच्या पध्दतीने राबविल्यामुळे सर्व निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या सर्व ग्रामपंचायती

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/ग्रापंनि २०२०/प्र.क्र.४/का.८
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २७ जानेवारी, २०२२

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतींच्या मुदत संपण्यापूर्वी निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र. रानिआ/मनपा २००५/प्र.क्र.४/का.०५,दि. २७/०१/२००५ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्याच्या सहा महिने अगोदरच्या कालावधीमध्ये, तिच्या क्षेत्रात व हद्दीमध्ये निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बदल करता येणार नाही.

आणि ज्याअर्थी, आयोगाच्या दिनांक २६/११/२०२१ च्या आदेशान्वये **माहे जानेवारी २०२१ ते नोव्हेंबर २०२१ मध्ये मुदत संपलेल्या सुमारे १८४९ ग्रामपंचायती , माहे डिसेंबर २०२१ ते डिसेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या सुमारे ६७४७ ग्रामपंचायती तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायती, आयोगाने प्रभाग रचना व आरक्षणाबाबत दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेला कार्यक्रम चुकीच्या पध्दतीने राबविल्यामुळे सर्व निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या** ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम दिलेला होता.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र अध्यादेश क्र. ३,दि.२३/०९/२०२१ अन्वये केलेल्या सुधारणेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयामधील रिट याचिका क्र.८४१/२०२१, विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ व रिट याचिका क्र. १३१६/२०२१ मधील दि.१५/१२/२०२१ रोजी झालेल्या निर्णयास अनुसरुन जो पर्यंत राज्य शासन त्रिस्तरीय चाचणी करुन स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करत नाही तोपर्यंत आगामी सार्वत्रिक/पोटनिवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करुन निवडणूका घेण्याचे आदेशित केल्यामुळे उपरोक्त प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम आयोगाच्या दिनांक २४/१२/२०२१ च्या पत्रान्वये स्थगित करण्यात आला.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य  संख्या, प्रभाग रचना व आरक्षण ) आदेश २०२१ - दिनांक २४/११/२०२१ मध्ये अंशत: सुधारणा करुन दिनांक २९/१२/२०२१ रोजी अंशत: सुधारीत आदेश क्र. १ निर्गमित करण्यात आले आहेत.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपील (सी) क्र.१९७५६/२०२१ मध्ये दि.१९ जानेवारी, २०२२ रोजी झालेल्या आदेशानुसार राज्याने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाबाबत असलेली आकडेवारी संबंधित मागासवर्ग आयोगास द्यावी. आयोगाने सदर आकडेवारी तपासून त्यानुसार योग्य त्या शिफारसी राज्यास तसेच राज्य निवडणूक आयोगास कराव्यात, असे आदेशित केले आहे.

आणि ज्याअर्थी, सदर शिफारसी प्राप्त होण्यास अथवा त्यानुसार योग्य तो निर्णय घेण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता असून निवडणुकांचे कामकाज विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने निवडणूक प्रभागांच्या हद्दी निश्चित करण्याचा टप्पा तत्पूर्वी पूर्ण करून घेणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, आयोगाने दिनांक २६/११/२०२१ रोजी दिलेल्या प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रमामध्ये काही ग्रामपंचायतींचा समावेश करण्याचे राहून गेल्याची शक्यता असल्याने, प्रभागाच्या सीमा निश्चित करण्यासाठी  नव्याने कार्यक्रम देणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, ग्रामपंचायतींच्या निवडणुकांच्या मुख्य तीन टप्यांना (प्रभाग रचना व आरक्षण, प्रभागनिहाय मतदार यादीचे विभाजन व प्रत्यक्ष निवडणूक) लागणारा कालावधी लक्षात घेता प्रभाग रचना व आरक्षणाच्या कार्यवाहीस तात्काळ सुरूवात करावी लागणार आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १० अ (४) नुसार मिळालेल्या व इतर अधिकारांचा वापर करुन, खालील ग्रामपंचायतींच्या प्रभागाच्या सीमा निश्चित करण्याकरीता आदेश देण्यात येत आहेत:-

i) **माहे जानेवारी २०२१ ते नोव्हेंबर २०२१ मध्ये मुदत संपलेल्या सुमारे १८८९ ग्रामपंचायती**

i) **माहे जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या सुमारे ६७०७ ग्रामपंचायती तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायती,**

ii) **आयोगाने प्रभाग रचना व आरक्षणाबाबत दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेला कार्यक्रम चुकीच्या पध्दतीने राबविल्यामुळे सर्व निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या ग्रामपंचायती**

## आदेश

ग्रामपंचायतींच्या सर्व निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असल्याने, त्यांनी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेऊन निवडणुका योग्यप्रकारे पार पाडाव्यात.

**ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण ) आदेश २०२१, दिनांक २४/११/२०२१ मध्ये प्रभाग रचना व आरक्षण करण्याची सविस्तर कार्यपध्दती नमूद केलेली आहे.** सदर प्रभाग रचना व आरक्षण आदेशामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १५/१२/२०२१ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने अंशत: सुधारणा करुन दिनांक २९/१२/२०२१ रोजी अंशत: सुधारीत आदेश क्र.१ निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपील (सी) क्र.१९७५६/२०२१ मध्ये दि.१९ जानेवारी, २०२२ रोजी आदेशित केल्यानुसार निवडणुकांचे कामकाज विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने **निवडणूक प्रभागांच्या हद्दी निश्चित करण्याचा टप्पा तत्पूर्वी पूर्ण करून घेण्याच्यादृष्टीने** आयोगाच्या दिनांक २४/११/२०२१ च्या प्रभाग रचना व आरक्षण आदेशामध्ये अंशत: सुधारणा करुन दिनांक २७/०१/२०२२ रोजी अंशत: सुधारीत आदेश

क्र.२ निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार योग्य ते बदल करण्यात यावेत. लगतच्या जनगणनेनुसार प्रभागांची संख्या व सदस्य संख्या निश्चित करावी. प्रारुप प्रभाग रचना तयार करुन त्यावर हरकती व सूचना मागविण्यात याव्यात. प्राप्त हरकती व सूचना विचारात घेऊन अंतिम प्रभाग रचना करण्यात यावी. प्रभागाच्या सीमा अंतिमत: अधिसूचित केल्यानंतर सदर प्रभागात आरक्षण निश्चित करण्याबाबतचे आदेश राज्य निवडणूक आयोगाकडून स्वतंत्ररित्या देण्यात येतील.

उक्त सर्व आदेशातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी उपजिल्हाधिकारी, तहसिलदार तसेच इतर संबंधितांनी घ्यावी.

सोबत जोडलेल्या परिशिष्ट १ नुसार प्रभागाच्या सीमा निश्चित करण्याचा कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र - परिशिष्ट १

प्रती -

१. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन.

उक्त कालावधीतील ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसंदर्भात अनुदानाची पर्याप्त तरतूद (मागील अनुदानाच्या थकबाकीसह) करण्याबाबत आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी. तसेच या पत्रात निर्देश दिल्यानुसार ग्रामसेवकासह संबंधित गटविकास अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.) जिल्हा परिषद यांची सक्रिय भूमिका व जबाबदारी राहील, तसेच प्रारूप प्रभाग रचना गुगल मॅप नकाशांच्या सहाय्याने संयुक्त सर्वेक्षणाअंती तयार करण्यासंबंधात आवश्यक ते सर्व सहकार्य संबंधित तहसिलदार यांना उपलब्ध करून देतील, याबाबतचे निर्देश देणारे पत्र आपणाकडून तातडीने निर्गमित करण्यात यावे.

२.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

३.विभागीय आयुक्त (सर्व),

४.जिल्हाधिकारी सर्व (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)

नव्याने स्थापित ग्रामपंचायतींचा तपशिल तात्काळ जिल्हाधिकारी कार्यालयास उपलब्ध करून देण्यात यावा.

६.माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

७.सर्व निवडणूक कार्यासने

८.निवड नस्ती.

## परिशिष्ट १

## आयोगाचे क्रमांक - रानिआ/ग्रापंनि २०२०/प्र.क्र. ४ /का.०८, दि. २७/०१/२०२२ रोजीच्या आदेशासोबतचे सहपत्र

## माहे जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या,नव्याने स्थापित तसेच आयोगाने प्रभाग रचना व आरक्षणाबाबत दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेला कार्यक्रम चुकीच्या पध्दतीने राबविल्यामुळे सर्व निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभागाच्या सीमा निश्चित करण्याचा कार्यक्रम.

| अ. क्र. | | प्रभाग रचना व आरक्षणाचा टप्पा | कार्यवाही पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| | | **प्रारुप प्रभाग रचना तयार करणे** | |
| १ | i) | तहसिलदार यांनी गुगलअर्थ चे नकाशे super impose करुन प्रत्येक गावाचे नकाशे अंतिम करणे | ३१/०१/२०२२ |
| | ii) | संबंधित तलाठी व ग्रामसेवक यांनी संयुक्त स्थळ पाहणी करुन प्रभाग पाडणे, सीमा निश्चित करणे | ०४/०२/२०२२ |
| | iii) | तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रभागाच्या सीमा दर्शविणाऱ्या प्रारुपाची तपासणी करणे. सदर समितीमध्ये गटविकास अधिकारी व संबधित मंडळ अधिकारी यांचा समावेश असेल. | ०८/०२/२०२२ |
| | iv) | सदर समितीने प्रभागाची सीमा दर्शविणारा **प्रारुप** प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेसाठी सादर करणे | १४/०२/२०२२ |
| | v) | जिल्हाधिकारी यांनी नमुना ब (प्रारुप प्रभाग रचना) ची संक्षिप्त तपासणी करणे व त्यात आवश्यक असल्यास दुरुस्त्या करणे व मान्यता देणे | १८/०२/२०२२ |
| | vi) | या दुरुस्त्या अंतर्भूत करुन प्रारुप प्रभाग रचनेला तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मान्यता द्यावी व समितीच्या सर्व सदस्यांनी स्वाक्षरी करावी. | २३/०२/२०२२ |
| | | **प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना मागविणे** | |
| २ | i) | प्रारुप प्रभाग रचनेला ( नमुना ब) व्यापक प्रसिध्दी देऊन तहसिलदार यांनी हरकती व सूचना मागविण्यासाठी जाहिर सूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | २५/०२/२०२२ |
| | ii) | प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती सादर करण्याचा अंतिम दिनांक | ०४/०३/२०२२ |
| | iii) | प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचना सुनावणीसाठी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर करणे | ०७/०३/२०२२ |
| | iv) | प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांवर उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे | १५/०३/२०२२ |
| | v) | आलेल्या प्रत्येक हरकती व सुचनांवर सुनावणीनंतर अभिप्राय नोंदवून अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे | २१/०३/२०२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रभाग रचना अंतिम करणे | | | |
| ३ | i) | उपविभागीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले प्रस्ताव तपासून जिल्हाधिकारी यांनी प्रभाग सीमा दर्शविणाऱ्या अंतिम अधिसूचनेस मान्यता देणे व स्वाक्षरी करणे | २५/०३/२०२२ |
| | ii) | जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम अधिसूचनेस (नमुना अ मध्ये) व्यापक प्रसिध्दी देणे | २९/०३/२०२२ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

GP ward formation new prog.